महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम , २०२१ कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी गस्ती नौका भाडेपट्टीने घेण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मत्स्यवि-१११५/प्र.क्र. १७४/पदुम-१४**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २४ मे, २०२३

**वाचा :**

१) **समक्रमांकाचा शासन निर्णय दि. २६ जुलै, २०२२**
२) **समक्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि. ०९ मे, २०२३**

**प्रस्तावना :**

उपरोक्त वाचा अ. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये १ गस्ती नौका खरेदी करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे दरम्यानच्या कालावधीसाठी १ गस्ती नौका भाड्याने घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर भाड्याने घेण्यात येणाऱ्या गस्ती नौकेचा कमाल कालावधी हा १ वर्ष + १ वर्ष यावरुन ८ वर्षे + २ वर्षे करण्यास वाचा-२ येथील शासन शुद्धीपत्रकाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याच धर्तीवर १ गस्ती नौका खरेदी करावयाची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत भाड्याने घ्यावयाच्या १ गस्ती नौकेचा कालावधी देखील ८ वर्ष + २ वर्ष असे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धीपत्रक :**

दि.२६ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे.

“......आणि भाड्याने घेण्यात येणाऱ्या अशा नौकेचा कमाल कालावधी हा (१ वर्ष +१ वर्ष) इतका असेल”

याऐवजी

“......आणि भाड्याने घेण्यात येणाऱ्या अशा नौकेचा कमाल कालावधी हा (८ वर्ष + २ वर्ष) इतका असेल”

असे वाचावे.

२. तसेच भाड्याने घेण्यात येणाऱ्या गस्ती नौकांचे तांत्रिक निकष निश्चित करण्यासाठी व त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी वाचा-१ येथील शासन निर्णयामध्ये नमूद आयुक्त (मत्स्य) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीमार्फत कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०६०७१५४६१९६६०१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KISHOR MAHADEO JAKHATE

Digitally signed by KISHOR MAHADEO JAKHATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=83112e1445917d0a21fbab36d7c0ff41e09863c93a2e62ea1b0c01da16b7a161, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=KISHOR MAHADEO JAKHATE
Date: 2023.06.07 15:46:57 +05'30'

**(किशोर जकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५. प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सह आयुक्त (सागरी), मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई.
९. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ठाणे/मुंबई शहर/मुंबई उपनगर/ रायगड/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षक/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
११. निवडनस्ती.